**रजिस्टर्ड ए.डी.द्वारा** **जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/ /२०२१.**
**दि.-**

**Black Listed Notice**

**प्रति,**
**जैन कॉम्प्युटर्स,**
**बाजारतळ, विरभद्र कॉम्प्लेक्स,**
**राहाता.**

**विषय –आपले नाव पुढील तीन वर्षाकरीता "Black Listed" करणेत येत असलेबाबत...**
**संदर्भ –** १) जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/८८४/२०२०, दि.०१/०८/२०२० रोजीचा पुरवठा आदेश.
२) जैन कॉम्प्युटर्स, राहाता यांचे दि.२१/०८/२०२० पत्र.

व्दारकामाई मंदिराचे परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची वायरींग भुमिगत करणेकामी लागणारे आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी निवीदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर साहित्यातील 2" HDEP Pipe 6 Kg (31 mtr) खरेदीकामी आपले दर निम्नतम प्राप्त झाल्याने आपणांस सदर पाईप पुरवठा करणेकामी उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर पुरवठा आदेशास अनुसरुन, आपण 2" HDEP Pipe 6 Kg (31 mtr) पुरवठा करणे आवश्यक होते. तथापी, आपण संस्थानला सदर पाईप पुरवठा न करता उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये " *कोरोना महामारीमुळे मार्केट मध्ये खुप रेट वाढलेले आहेत त्यामुळे मी हे मटेरियल आपणांस देऊ शकत नाही व मला ते परवडत नाही. तरी, मे.साहेबांस विनंती की माझ्या नांवे निघालेली ऑर्डर कॅन्सल करणेत यावी* " असे कळविलेले आहे. आपण सदर पाईप पुरवठा न केल्याने संस्थानला सदरकामी पुनःश्च निवीदा प्रक्रिया राबवावी लागलेली आहे. तसेच सदरकामी संस्थाचा देखील वेळ वाया गेलेला आहे. तसेच व्दारकामाई मंदिराचे परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची वायरींग भुमिगत करणेकामी विलंब झाला आहे.

तरी, उपरोक्त गोष्टींचा सारासार विचार करता, आपण 2" HDEP Pipe 6 Kg (31 mtr) पाईप पुरवठा न करुन पुरवठा आदेशातील अटी शर्तीचा भंग केलेला असल्याने आपणांस पुढील तीन वर्षाकरीता Black Listed करणेत येत आहे.

**(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**